नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०५/२०२६ (शुक्रवार )**

---

## कोणतीही ठोस माहीती उपलब्ध नसतांना देखील उपलब्ध तांत्रिक पुराव्याचे सखोल विश्लेषण करून बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा उघड अज्ञात विधीसंघर्षग्रस्त बालकाचा आसाम आणि नागालॅन्ड राज्यात जावुन घेतला शोध,जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील अल्ववयीन पिडीत /फिर्यादी हिने पोलीस स्टेशन येथे येवुन तोंडी रिपोर्ट दिली कि, एक अनोळखी आरोपी यांने पिडीतेला वेगवेगळया मोबाईल वरून अश्लिल मॅसेज करून तु माझे सोबत प्रेम केले नाही तर तुला जिवानिशी ठार मारून टाकीन अशा प्रकारचे मॅसेज वेगवेगळया मोबाईल क्रमांकाने व्हॉटसॅपवरून पाठवुन धमकी दिल्याने अल्ववयीन पिडीत /फिर्यादी हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे जलालखेडा येथे दिनांक २३/०१/२०२६ रोजी कलम ७८(२)(ii), ३५१(२), ३५२ भान्यासं सहकलम १२ बालकाचे लैंगिक अत्याचार पासुन संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान जलालखेडा पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण यांचे मदतीने संयुक्तरित्या तपास करत गुन्हयात अनोळखी आरोपीने वापरलेले मोबाईल व्हॉटसप चॅट बाबत सखोल तांत्रिक विश्लेषण करून सदर आरोपी चे लोकेशन हे आसाम राज्य आणि नागलॅन्ड राज्यामध्ये असल्याबाबत माहीती प्राप्त केली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर नागपुर ग्रामीण जिल्हा, आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात एक पोलीस पथक आसाम राज्यातील उदलगिरी जिल्हा, कारबियांलग जिल्हा

तसेच नागालॅन्ड राज्यातील दिमापुर येथे पाठविले. पोलीस पथकाने स्थानिक पोलीसांचे मदतीने १२ दिवस नमुद आरोपीचा शोध घेतला. दिनांक १२/०५/२०२६ रोजी सदर गुन्हयातील अनोळखी इसमाबाबत ठोस माहीती प्राप्त झाली. नमुद इसमाचा शोध घेतला असता सदर इसम हा चुंगाबुध, पोस्ट सियाजुली, जि. उदंलगिरी येथे मिळुन आला. नमुद इसम हा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याची माहीती प्राप्त झाली. **अशा प्रकारे तांत्रिक पुराव्याचे आधारे सखोल विश्लेषन करून पोलीसांनी कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसतांना सदर गुन्हयातील अज्ञात विधीसंघर्षग्रस्त बालाकाचा शाेध घेवुन गुन्हा उघड केला.**

## क्रिकेट सट्टा /बेटिंग जुगार खेळणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद
## ३० हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १४/०५/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा **आणि** श्री अनिल म्हस्के, अपर नागपुर ग्रामीण जिल्हा,यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने टाटा इंडियन प्रीमियर लीग (IPL) अंतर्गत मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्ज या क्रिकेट सामन्यावर अवैधरित्या ऑनलाईन सट्टा बेटिंगद्वारे जुगार खेळणाऱ्या तसेच सट्टा व्यवसाय चालविणाऱ्या आरोपींवर कारवाई करीत खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्र १)** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीतीवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत गेस्ट हाउस बार ॲण्ड रेस्टॉरंट, महाजन लेआउट, कळमेश्वर येथे धाड टाकली असता **आरोपी १) सचिन पुंडलीक राऊत, वय ३९ वर्ष, रा. कळमेश्वर, वॉर्ड क्रमांक १६ ,कळमेश्वर आणि २) विजय उर्फ विजू दिगंबर महाजन, वय ४३ वर्षे, रा. महाजन लेआउट, कळमेश्वर हे मिळुन आले.** सदर आरोपी यांनी अँड्रॉइड मोबाईल मध्ये बेटींग आयडी बनवुन बेंटींग साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतल्याचे दिसुन आले. नमुद आरोपींना अधिक विचारपुस केली असता **आरोपी क्रं ३) गणेश वरठी रा काटोल** याच्या सांगण्यावरून क्रिकेट सट्टा चालवित

असल्याची माहीती दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष अरोपीतांच्या ताब्यातुन १) २ ॲंडरॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रुपये.२) रोख रक्कम ५२०/— रुपये असा एकूण २०,५२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला.नमुद तिन्ही आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

**कारवाई क्रं २)** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीतीवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत सुदर्शन गेस्टहाउस ॲण्ड लॉजिंग, कळमेश्वर येथे धाड टाकली असता **आरोपी क्रं १) जितेंद्र गोविंदराव कोल्हे,वय ३७ वर्ष, राहणार कळमेश्वर, वॉर्ड क्रमांक १५, कळमेश्वर** हा अँड्रॉइड मोबाईलमध्ये आयडी बनवुन बेंटींग साईटवरून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी क्रिकेट सट्टयावर ग्राहकाकडुन ऑनलाईन पैसे घेतांना मिळुन आला.त्याला अधिक विचारपुस केली असता तो **आरोपी क्रं २) गौतम पाटील, रा.कळमेश्वर याच्या** सांगण्यावरून क्रिकेट सट्टा चालवित असल्याची माहीती दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष अरोपीच्या ताब्यातुन १ ॲंडरॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रुपये असा एकूण १०,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला. नमुद आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ४९ भान्यासं सह कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

**दोन्ही कारवाईत ३ ॲंडरॉईड मोबाईल सह एकुण ३०,५२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला.नमुद आरोपीविरूध्द दोन गुन्हे नोंद करण्यात आले.**



**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मृद्देमालासह**

## हरविलेल्या अल्पवयीन बालकाचा अवघ्या एका तासाच्या आत घेतला शोध, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** पोलीस स्टेशन भिवापुर येथे १४/०५/२०२६ रोजी रामदास गलमळे रा. मेटेपार ता. चिमुर जि. चंद्रपुर यांनी माहीती दिली की, ते भिवापुर येथे त्यांच्या परीवारासह लग्न समारंभाकरीता आले होते. त्याचा मुलगा नामे मितांश रामदास गलमळे ,वय ३ वर्षे ६ महीने हा दिंनाक १४/०५/२०२६ रोजी चे सायकाळी ०७/३० वा पासुन मिळुन येत नाही त्यांनी आजुबाजुला शोध घेतला तरी सुध्दा तो मिळुन आला नाही. अशी माहीती प्राप्त होताच भिवापुर पोलीसांनी तात्काळ बालकाचा शोध सुरू केला. वेगवेगळे पोलीस पथके वेगवेगळया दिशेने रवाना केले. पोलीसांना सदर बालक हा भिवापुर बसस्थानक येथे बसलेला मिळुन आला. सदर बालक हा त्याच्या आईच्या मागे जात असतांना रस्ता चुकुन जवळच असलेल्या बसस्थानकावर निघुन गेला होता. अवघ्या एका तासाच्या आत सदर

बालकाचा शोध घेवुन सुखरूप पालकांच्या ताब्यात देण्यात आले. पालकांनी भिवापुर पोलीसांचे आभार व्यक्त केले.



**पोलीस पथक अल्पवयीन बालक आणि पालकांसोबत**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १४/०५/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा **आणि** श्री अनिल म्हस्के, अपर नागपुर ग्रामीण जिल्हा,यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करून गुन्हे नोंद करण्यात आले.

**पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत आरोपी महेन्द्र आत्माराम आग्रे, वय ४२ वर्ष, रा. माथणी, ता. मौदा हा मौजा चक्रधर स्वामी घाट, मौदा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन वडोदा** अंतर्गत सावली शिवार येथे आरोपी मोनु प्रमोद शर्मा, वय २४ वर्ष, रा. प्लॉट न २, इंदीरा नगर, अजनी नाग मंदीर जवळ नागपूर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन केळवद** अंतर्गत मौजा खुरजगाव शिवार येथील सावनेर ते छिंदवाडा रोडचे बाजुला सार्वजनीक जागेत आरोपी क्रं १) अभय विठोबा धुर्वे, वय २४ वर्ष, रा. वार्ड क. ०१, खानगाव ता. सावनेर, जि. नागपुर, क्रं २) आदित्य बाबाराव महाजन, वय २७ वर्ष, रा. साई मंदिरजवळ, सावनेर ता. सावनेर जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.आरोपी क्रं ३) आश्रय विजय झलके, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क ०१ खानगाव ता. सावनेर जि. नागपुर हा मौजा रायबासा शिवार येथील नागठाना येथील नाग मंदिरा जवळील सार्वजनीक जागेत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला आणि आरोपी क्र. ४) प्रविण भुजगराव नारनवरे, वय ३० वर्ष, रा. महाजन लेआऊट, सावनेर ता. सावनेर जि. नागपुर हा मौजा केळवद शिवार येथील सावनेर ते केळवद जाणाऱ्या रामपुरी फाटया जवळील सार्वजनीक जागेत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत मौजा कावरापेठ येथे आरोपी १) आकाश वसंता शंभरकर, वय २६ वर्ष, रा. विरली, ता. उमरेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. क्रं २) सुरज श्रीराम धुर्वे, वय २८ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड हा एस के टी स्टाल कावरापेठ उमरेड येथे , आरोपी क्र. ३) हितेश गजानन धुर्वे, वय २४ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड हा नायडु बाजार पेट्रोलपंप जवळ, उमरेड

येथे आणि आरोपी क्र. ४) तेजस विनायक झाडे, वय २४ वर्ष, रा. बालाजी नगर, उमरेड हा संतोष टी स्टॉल च्या मागे कावरापेठ उमरेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**वर नमुद १० आरोपींवर एन डी पी एस कायदयान्वये १० गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०८ गुन्हे नोंद. एकुण ९,३६१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १४/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ९,३६१/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे बाबारावजी सितारामजी राजुरकर वय ६० वर्ष रा. पेठबुधवार काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्रं १) नामदेव सुधाकर बालपांडे वय ५३ वर्ष रा. वार्ड नं. १७ नरखेड जि. नागपुर आणि आरोपी क्रं २) पंकज दिपक राउत वय ३५ वर्ष रा. वार्ड नं. ०९ नरखेड जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे अशपाक मुस्तफा शेख वय ४१ वर्ष रा. लोहारीसावंगा रा. नरखेड जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे रोशन षेकर दुधपचारे वय ४२ वर्श रा. वेलतुर ता. कुही जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे राजेंद्र दौलत निमजे वय ५६ वर्ष रा. ईतवसारीपेठ उमरेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे कैलास भगवान डहारे वय २६ वर्ष रा.मांढळ ता कुही,याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे गोपाल ओंकार कंभाले वय ३८ वर्ष २. गौतम एकनाथ डांगरे दोन्ही रा. बेला सोनेगाव लोधी ता. जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. अशा ०८ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०८ गुन्हे दाखल केले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १९ गुन्हे नोंद

दिनांक १४/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे ०२ गुन्हे नोंद, आहे.

**नमुद कारवाईत एकुण २५ लिटर मोहाफुल गावठी दारू, १०१७० मिली देशी दारू तसेच वाहन, ७२० मिली विदेशी दारू असा एकुण ७८९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने